# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :- रानिआ/मनपा २०१०/प्र.क्र. ६ /का.५.
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०३/०१/२०११

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी

विषय :- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा सुरक्षित साठा करणे व त्यांच्या संख्येचा हिशोब ठेवणे...

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या या विषयावरील समक्रमांकाच्या दिनांक ३०/११/२०१० च्या सूचनानुसार राज्य निवडणूक आयोगाची मतदान यंत्रे ही निश्चित केलेल्या संख्येनुसार जिल्हाधिकारी तसेच महानगरपालिका कार्यालयांच्या ताब्यात सुरक्षितपणे ठेवावयाची आहेत. त्याकरिता आयोगाच्या सूचनानुसार इतर जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका कार्यालयांकडून मतदान यंत्रे ताब्यात घेणे किंवा आपल्याकडील मतदान यंत्रे इतर जिल्हाधिकारी / महानगरपालिका कार्यालयांना देणे अशी कार्यवाही त्वरित करणे आवश्यक होते. त्यानुसार बहुतांश जिल्हाधिकारी / महानगरपालिका कार्यालयांनी अशी कार्यवाही केली असली तरीही आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, सुमारे एक महिन्याचा कालावधी गेल्यानंतरही काही जिल्हाधिकारी कार्यालयांनी / महानगरपालिका कार्यालयांनी मतदान यंत्रे ताब्यात घेण्याची कार्यवाही केलेली नाही. ही बाब फारच गंभीर व आक्षेपार्ह आहे.

तरी या पत्राद्वारे आपणाला पुन्हा कळविण्यात येते की, सदर मतदान यंत्रे (सीयु, बीयु आणि डीएमएम) आयोगाने निश्चित केलेल्या संख्येनुसार संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका कार्यालयांनी आपल्या ताब्यात सुरक्षितपणे ठेवावयाची आहेत. त्याकरिता सदर पत्रांत नमूद केल्यानुसार आवश्यक संख्येत मतदान यंत्रे संबंधित कार्यालयांकडून त्वरित ताब्यात घेण्यात यावीत आणि सद्यस्थितीत ज्या ज्या कार्यालयांना यंत्रे दयावयाची आहेत त्या त्या कार्यालयांना ती त्वरित देण्यात यावीत.

D:\EVM\evm stock counting dir.rtd

१८०

त्याचप्रमाणे १) आपल्या कार्यालयात ठेवण्यात येणा-या मतदान यंत्रांचे अनुक्रमांक (सीयु, बीयु अनुक्रमांक व सीयु व बीयुच्या पेटीचे अनुक्रमांक) यांची नोंदवही तयार करुन ती संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जबाबदार अधिका-याच्या ताब्यात ठेवावयाची आहे. २) अशा मतदान यंत्रामध्ये असलेल्या डीएमएम / मेमरी चिप्स या मतदान यंत्रापासून वेगळया काढून त्यावरील अनुक्रमांक वेगळया नोंदवहीत नोंदवून अशा डीएमएम संबंधित जबाबदार अधिका-याच्या ताब्यात ठेवावयाच्या आहेत. डीएमएमकरिता वेगळी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ३) सुरक्षिततेच्या दृष्टीने किंवा जिल्हाधिकारी कार्यालयात पुरेशी जागा नसल्यामुळे अशी मतदान यंत्रे किंवा डीएमएम / मेमरी चिप्स अधिनस्त तालुका कार्यालयांत ठेवली असतील तर त्याकरिता वेगळी नोंदवही ठेवून त्याची साक्षांकित प्रत जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित अधिका-याच्या ताब्यात ठेवणे बंधनकारक राहील. ४) डीएमएमचा हिशोब अचूक राहण्याच्या दृष्टीने व निवडणुकांकरिता डीएमएम वेळेवर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने वापरलेल्या आणि उप कोषागारात किंवा सुरक्षित जमा कक्षात ठेवलेल्या मेमरी चिप्स / डीएमएम (ज्यामध्ये निवडणूक याचिका किंवा रिट याचिका प्रलंबित आहेत अशा मेमरी चिप्स / डीएमएम वगळून) तीन महिन्यांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्वरित काढून त्या जिल्हाधिकारी कार्यालय किंवा यथास्थिती महानगरपालिका कार्यालय येथे संबंधित जबाबदार अधिका-याच्या ताब्यात ठेवणे बंधनकारक राहील.

याबाबत जिल्हाधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्त यांनी स्वत: जातीने लक्ष देऊन जबाबदार अधिका-याची या कामी नियुक्ती करुन कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा हलगर्जीपणा होणार नाही याकरिता आवश्यक ती दक्षता घ्यावी. ही बाब अत्यंत महत्त्वाची व तातडीची असून कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा अथवा बेजबाबदारपणा आढळून आल्यास संबंधितांविरुध्द अत्यंत कडक कारवाई केली जाईल. याबाबत सर्व संबंधितांना सूचना देण्यात याव्यात. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक ६ जानेवारी, २०११ पर्यंत आयोगाच्या कार्यालयात सादर करावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

आपला,

( मंगेश मोहिते )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग

D:\EVM-evm stock reporting doc.rtf